# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्रकाशगड, २रा मजला, प्लॉट नं. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
दूरध्वनी क्र. : ०२२-२६४७४२११ विस्तारित : ३६४२, फक्स : ०२२-२६५८१५१६.
ई-मेल : promahagenco@gmail.com / promahagenco1@gmail.com


---

क्र. : सा.नि.सु./जनसंपर्क/वृत्तपत्रीय टिप्पणी/५२ दिनांक : ०९/०३/२०२१.

**महानिर्मितीची विक्रमी १०,४४५ मेगावॅट वीजनिर्मिती, महानिर्मितीच्या इतिहासात ६० वर्षातील सर्वाधिक वीजनिर्मिती सलग दुसऱ्या दिवशी विक्रमी वीजनिर्मिती**

-------------------

**मुंबई (दि. ९ मार्च २०२१) :** महाराष्ट्र राज्याची वाढती विजेची मागणी पूर्ण करताना देशातील एक अग्रगण्य वीजनिर्मिती कंपनी म्हणून नावलौकिक असलेल्या महानिर्मितीने आपल्या नावाला साजेशी कामगिरी बजावत आज रोजी दुपारी ४.४० वाजता एकूण १०,४४५ मेगावॅट वीजनिर्मिती साध्य करून औष्णिक वीजनिर्मितीमध्ये एक विक्रमी शिखर सर केले आहे. महानिर्मितीच्या सुमारे ६० वर्षातील सर्वोच्च वीजनिर्मितीचा हा नवा उच्चांक आहे.

दि. ७ मार्च पासूनची आपली कामगिरी अधिकाधिक उंचावत आज ही सरस कामगिरी करत हा उच्चांक साध्य करताना आपला यापूर्वीचा २० मे २०१९ रोजीचा १०,०९८ मेगावॅटचा उच्चांक मोडताना महानिर्मितीने आधी १०,२७५ मेगावॅट वीजनिर्मिती साध्य केली व त्यात सातत्य राखत आता दु ४.४० वाजता आजचा स्वतःचाच विक्रम मोडून १०,४४५ मेगावॅट वीजनिर्मितीची ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

यामध्ये औष्णिक वीज निर्मितीद्वारे ७,९९१ मेगावॅट , वायू वीज निर्मिती केंद्राद्वारे २६४ मेगावॅट तर जल विद्युत केंद्राद्वारे २,१३८ मेगावॅट आणि सौर ऊर्जा प्रकल्पामधून ५० मेगावॅट इतकी वीजनिर्मिती करण्यात आली आहे. या वेळी महावितरणची विजेची मागणी २२,१२९ मेगावॅट होती तसेच राज्याची एकूण वीजनिर्मिती १६,४२९ मेगावॅट इतकी होती. १०,००० पेक्षा जास्त वीजनिर्मितीचा आकडा पुन्हा गाठण्याची ही केवळ तिसरी वेळ आहे. काल दि. ८ मार्च रोजीही महानिर्मिती ने १०,०९७ मेगावॅट निर्मिती साध्य केली होती.

राज्यातील उद्योग, व्यवसाय यांची वाढती विजेची मागणी तसेच सुरू होत असलेल्या उन्हाळ्यामुळे एकूण राज्याची विजेची मागणी वाढत असून त्याची पूर्तता करण्यासाठी आपण सक्षम असल्याचे महानिर्मितीने सिद्ध केले आहे. विविध समस्यांवर यशस्वीपणे मात करून आगामी काळात याच प्रकारे सातत्याने १०,००० मेगावॅट वीजनिर्मिती करून नवनवे उच्चांक करण्यास महानिर्मिती सज्ज आहे, हेच या विक्रमी कामगिरीने दाखवून दिले आहे.

प्रभावी इंधन व्यवस्थापन, उत्कृष्ट कार्यप्रणाली याद्वारे महानिर्मितीने कमीतकमी दरामध्ये वीजनिर्मिती करून राज्यातील वीज ग्राहकांना दिलासा दिला आहे .

मा. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी कोळसा पुरवठा सुरळीत होण्यासाठी केलेले अथक प्रयत्न व महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. संजय खंदारे यांचे नेतृत्वाखाली महानिर्मितीने राबविलेल्या अनेक सुधारणा यामुळे ही विक्रमी वीजनिर्मिती कामगिरी साध्य झाली आहे. त्याबद्दल प्र. संचालक (संचलन) राजू बुरडे ,संचालक (मायनिंग) पुरुषोत्तम जाधव, संचालक (वित्त) बाळासाहेब थिटे व प्र. कार्यकारी संचालक अभय हरणे यांनी त्यांचे आभार मानले असून या सामूहिक यशाबद्दल सर्व कर्मचारी, अभियंते, तंत्रज्ञ तसेच अस्थायी कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे. मा. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत व मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजय खंदारे यांनी पूर्ण महानिर्मिती परिवाराचे या अभूतपूर्व कामगिरीबद्दल विशेष अभिनंदन केले आहे.

---

दिनांक : ०९/०३/२०२१.

प्रति,
**मा. संपादक**
**दैनिक / वृत्तवाहिनी**

आदरणीय महोदय / महोदया,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तींत / वाहिनीवर प्रसिद्ध करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपले स्नेहांकित,

**(महेश आफळे)**
**जनसंपर्क अधिकारी**